# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26



पाटण : उद्घाटनप्रसंगी विक्रमसिंह पाटणकर, समवेत मान्यवर.

# रोजगार मागण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा : विक्रमसिंह पाटणकर

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षण घेत असताना करियर घडविण्यासाठी योग्य मार्गदर्शनाच्या शोधात असतो. त्याला पाटण महोत्सवामध्ये विविध स्टॉल हे योग्य मार्गदर्शन करण्यास फायदेशीर ठरतील. त्यातून प्रेरणा घेऊन स्वतःचा व्यवसाय निर्माण करावा. पाटण महोत्सवामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळेल. विद्यार्थ्यांनी रोजगार मागण्यापेक्षा रोजगार निर्मिती देणारे झाले पाहिजे असे प्रतिपादन माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

पाटण महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दयानंद मस्के, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, दादासाहेब जाधव, शरद देशमुख, पृथ्वीराज पाटील, प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे, डॉ. हेमलता काटे उपस्थित होते.

विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, छोट्या उद्योगातून मोठा उद्योग निर्माण होत असतो. सुरुवातीला लहान उद्योगापासून सुरुवात करावी. स्वयं निरीक्षण, अनुभव यातून आपला नवीन उद्योग उभा करावा. उद्योग वाढवून आपल्यासोबत समाजाची प्रगती करावी. उद्योगाच्या माध्यमातून रोजगार कसा निर्माण होईल याकडे देखील लक्ष दिले पाहिजे. पाटण तालुक्यात वन पर्यटनामध्ये मोठी संधी आहे. स्थानिक युवकांनी याचाही फायदा घेऊन घ्यावा. पाटण महोत्सवातील स्टॉलला भेट देऊन नवीन तंत्रज्ञान, शेती, गृह उद्योग, लघुउद्योग यातून आपल्याला साजेसा असा उद्योग उभा करावा आणि त्यातून परिसरातील अनेकांना रोजगार निर्माण कशी होईल याकडे पहावे. पाटण महोत्सवाच्या माध्यमातून संधीचे सोने करून युवकांनी नवीन उद्योग उभा करावा. या तीन दिवसाच्या पाटण महोत्सवा मध्ये परिसरातील सर्व विद्यार्थी, शेतकरी, महिला यांना आवर्जून भेट देण्यासाठी सांगा. या संधीचा फायदा आपण घ्यावा असे आवाहन देखील त्यांनी केले.

यावेळी विद्यार्थी तालुक्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी, परिसरातील शेतकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.